नोव्हेंबर / November
मंगळवार / Tuesday
दि.१० / Dt: 10
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ८ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २२/Issue 22 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

ज्ञानज्योत महाविद्यालय
नेर
ता. जि. जालना

शुभेच्छुक
रामनाथ पवार
मुख्याध्यापक

शुभ दिपावली

दीपावली निमित
सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा

दिव्यांच्या या पावन पर्वावर
आपल्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य,
ऐश्वर्य आणि उत्तम यश लाभो,
ही सदिच्छा...!

बबनराव लोणीकर
आमदार मंठा परतूर नेर– सेवली मतदार संघ.
तथा मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महाराष्ट्र राज्य

कै.के.रामलू साहेब

कुंडलवाडी व परिसरातील सर्व नागरिकांना

दीपावली

निमित्त हार्दिक शुभेच्छा..!

सौ.प्रेरणाताई गजानन कोटलावार
(नगराध्यक्षा, नगर परिषद कुंडलवाडी)

श्री गजानन रमेश कोटलावार

शुभेच्छुक :- नगराध्यक्ष नगर परिषद कुंडलवाडी ता. बिलोंली, जि. नांदेड

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ — पान नं.२



पाणीटंचाईचा काळ, दिवाळी सणांमध्ये हजारो लिटर पाणी वाया?

भादा येथील गावशेजारी पाण्याची मोठी गळती; ग्रामस्थांनी व्यक्त केली मोठी चिंता

औसा । बी.डी. उबाळे

औसा तालुक्यातील भादा येथे गेल्या दोन दिवसापासून गावच्या पूर्वेस असलेली पाईपलाईन ही फुटल्याने हजारो नाहीतर लाखो लिटर पाणी वाया गेल्याची भीती भादा गावातील दक्ष नागरिकांनी व्यक्त केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, भादा गावांमध्ये सध्या पाणीटंचाईचा परिणाम दिसत असून शासन स्तरावर विविध उपाय योजना राबविण्याकरिता युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात असून सध्या भादा गावात काही भागांमध्ये पाणीच येत नसल्याने स्वखर्चातून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. परंतु गावासाठी उपलब्ध झालेली शासनाकडूनची पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा योजनेतून पाचखेडी पाणीपुरवठा योजना नुकतीच कार्यान्वित करण्याकरिता भादा येथील पंचायत समिती सदस्य किशोर (पिंटू) जवंजाले, भावी सरपंच आर.टी. शिंदे तसेच काही दक्ष ग्रामस्थांकडून लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे आणि लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज देशमुख यांच्याकडे ग्रामस्थांनी पाठपुरावा करून या जीवन प्राधिकरण योजनेवर थकीत असलेले मागील वीज वितरण कंपनीचे बिल अंदाजे जवळपास ३२ लक्ष रुपये हे सार्वजनिक बिल असल्याने ते पूर्णपणे माफ करून किंवा ते बिल भरण्याबाबत सूट देऊन नवीन पाणीपुरवठा योजना कार्यवाहीत केली आणि त्या पाणीपुरवठा योजनेसाठी चोवीस तास वीज वितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा सुरू ठेवावा याकरिता २४ तासाचे फिडर बसविण्यात आले असल्याचे समजते. परंतु ही योजना कार्यान्वित करण्यापूर्वी गेल्या अनेक वर्षापासून बंद असल्याने ती सुरळीत चालते काय? याची चाचणी करणे आवश्यक होती परंतु तसे काहीही न करता पाणीपुरवठा सुरू केल्याने दोन ते तीन दिवसापासून विविध भागांमध्ये पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया गेल्याची भीती नागरिकाकडून व्यक्त केली जात आहे.

या यंत्रणे करिता आणि सदरील पाणीटंचाईच्या काळामध्ये सणासुदीचे दिवस असताना पाणी येत नाही तरीही इतके लाखो लिटर पाणी वाया जायाचे कारण काय? आणि सदरील योजनेवर इतका दुर्लक्षपणा का? याला जबाबदार कोण? याची दखल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घ्यावी अशी मागणी अनेक दक्ष भादेकराकडून केली जात आहे. सदरील पाईपलाईन यापूर्वीचे येथील ग्रामपंचायतकडून तत्कालीन उपसरपंच बालाजी शिंदे यांनी संबंधित कार्यालयाला किंवा यंत्रणेला माहिती दिली किंवा नाही पण ती पाइपलाइन कट करण्यात आल्याने सदरील लाखो लिटर पाणी वाया गेले असून सध्या दिवाळी सणाचे दिवस असल्याने ते पाईपलाईन दुरुस्तीसाठी मजूर भेटत नाहीत यामुळे सदरील काम सण होईपर्यंत स्थगित ठेवण्यात आले आहे त्यानंतर पूर्ववत पाणी पुरवठा करण्यात येईल. किशोर (पिंटू) जवंजाळे, पंचायत समिती सदस्य भादा.ता औसा.



नापिकीला कंटाळून हकनकवाडीतील शेतकरी पुत्राची आत्महत्या

लातूर । प्रतिनिधी

हकनकवाडी तालुका उदगीर येथील तरुण युवक गोपीनाथ संभाजी करलेवाड, वय वर्षे २६ या शेतकरी पुत्राने पिकावर फवारण्याचे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. त्यांची तोंडार सज्जा मध्ये वडीलांच्या नावावर सर्वे नं. ५४/१ मध्ये १ हेक्टर हालक्या प्रतीची जमीन आहे. यंदा खुपच कमी पाऊस पडल्यामुळे पीके करपून गेली हाती काही लागले नाही. वडील संभाजी कारलेवाड मुके, बहिरे आणि वेडे आहेत. आई सीमाबाई ही भोळसर आहे. गोपीनाथ कारलेवाड हाच घरकर्ता होता. आर्थिक परिस्थिती खुपच बिकट झाल्यामुळे मजुरी केंव्हातरी लागायची म्हणून पुढील वर्षे कसे काढायचे हा प्रश्न त्याला भेडसावत आसल्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलले व विषारी औषधी प्राशन करून आत्महत्या केली. या घटनेमुळे हकनकवाडी तसेच परिसरातील जनतेतून हळहळ व्यक्त केले जात आहे. तरी शासनाने व प्रशासनाने याची दखल घेऊन सदरील व्यक्तीच्या आईवडिलांना मदत करावी. व आणखी काही अशा घटना घडु नयेत यासाठी शेतकऱ्यांना भरीव मदत करावी, अशी जनतेतून मागणी होत आहे.



जिल्हा बँकेच्या निवडणूकीत मतदारांना धमकावणे व दबाव आणण्याचे प्रकार रोखावेत; काँग्रेसचे निवडणूक निर्णय अधिकारी व पोलिस अधिक्षकांना निवेदन

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निलंगा, औसा परिसरात ८ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनेची गंभीर दखल घेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकारी व पोलिस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले. मतदारांना धमकावणे, दबाव आणणे तसेच मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचे प्रकार रोखून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निर्भय, निष्पक्ष व पारदर्शक वातावरणात पार पाडावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

विनोद राजेंद्र वीर यांनी औसा पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या लेखी तक्रारीनुसार, त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना अडवून धमकावणे, मारहाण करणे, मोबाईल फोन जबरदस्तीने घेणे तसेच त्यांच्या इच्छे विरुद्ध दुसऱ्या वाहनात बसविण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या कथित प्रकारामुळे मतदारांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता काँग्रेसने व्यक्त केली आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक मतदाराला कोणत्याही राजकीय दबावाशिवाय आणि धमकीशिवाय मतदान करण्याचा अधिकार आहे. सहकारी बँकेची निवडणूकही याच लोकशाही मूल्यांच्या आधारे पार पडली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीने किंवा गटाने बळाचा वापर करून मतदारांवर दबाव आणणे अथवा त्यांना मतदानापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे चुकीचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणाची निवडणुकीच्या अनुषंगाने चौकशी करून आवश्यकतेनुसार पोलीस प्रशासनाकडून अहवाल मागवावा, सर्व पात्र मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे याची खात्री करावी, सर्व मतदान केंद्रांवर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा तसेच संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय मतदारांना धमकावणे, प्रलोभन देणे, बळजबरी करणे अथवा मतदानापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी. मतदारांना तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध करून द्यावी आणि निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी, अशीही मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक ही सहकार क्षेत्रातील महत्त्वाची लोकशाही प्रक्रिया असून, प्रत्येक मतदाराला कोणत्याही दबावाशिवाय स्वतःच्या इच्छेने मतदान करता आले पाहिजे. निवडणूक प्रक्रियेवर मतदारांचा विश्वास कायम राहण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने निवेदनातून मांडली आहे. यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे व विविध संस्था पदाधिकारी कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

रेणा साखर कारखान्याला शिवसेना यांचा इशारा: गेटकेन ऊस तात्काळ थांबवा, स्थानिक शेतकऱ्यांच्या उसाला प्राधान्य द्या!

रेनापूर । प्रतिनिधी

रेणा सहकारी साखर कारखान्याने बाहेरून आणला जाणारा गेटकेन ऊस तात्काळ बंद करावा आणि कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक शेतकऱ्यांच्या उसाची तोडणी त्वरित सुरू करावी, असा कडक इशारा शिवसेना (एकनाथ शिंदे गट) तालुकाप्रमुख कोंडीराम काळे यांनी दिला आहे. स्थानिक शेतकऱ्यांचा ऊस तोडणीस आला असतानाही कारखान्याकडून बाहेरील ऊस प्राधान्याने गाळपासाठी आणला जात असल्याच्या तीव्र तक्रारी परिसरातील शेतकऱ्यांमधून येत आहेत. या पार्श्वभूमीवर कोंडीराम काळे यांनी कारखान्याच्या कारभारावर जोरदार निशाणा साधला.



स्थानिक शेतकरी अडचणीत, गेटकेनला प्राधान्य का?

पत्रकारांशी बोलताना कोंडीराम काळे म्हणाले, स्थानिक भागातील शेतकऱ्यांनी अतोनात कष्ट करून ऊस पिकवला आहे. ऊस तोडणीचा काळ उलटून चालला तरी स्थानिक उसाला तोड दिली जात नाही, तर दुसरीकडे कारखाना प्रशासन मात्र परजिल्ह्यातून किंवा बाहेरील भागातून गेटकेन ऊस आणण्यात व्यस्त आहे. प्रशासनाच्या या धोरणामुळे स्थानिक बळीराजाचा ऊस शेतातच वाळून जाण्याची भीती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे.

तीव्र आंदोलनाचा इशारा

शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारा हा प्रकार शिवसेना अजिबात सहन करणार नाही. कारखाना प्रशासनाने तात्काळ बाहेरील गेटकेन ऊस आणणे बंद करावे आणि स्थानिक भागातील ऊसतोडणीला गती द्यावी. जर प्रशासनाने स्थानिक शेतकऱ्यांचा ऊस त्वरित तोडण्यास सुरुवात केली नाही, तर शिवसेनेच्या वतीने कारखान्याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. यामुळे होणाऱ्या परिणामांना सर्वस्वी कारखाना प्रशासनच जबाबदार राहील, असा सज्जड दमही कोंडीराम काळे यांनी दिला. शिवसेनेच्या या आक्रमक भूमिकेमुळे रेना साखर कारखाना प्रशासन काय निर्णय घेते आणि स्थानिक ऊसतोडणी कधी गतिमान करते, याकडे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटनेच्या निवेदनाला यश; लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून माथाडी व महिला कामगारांना राशन किटचे वाटप!

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतीमालाची आवक घटल्यामुळे माथाडी कामगार, महिला कामगार तसेच तोलार यांच्या हाताला पुरेसे काम मिळत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. परिणामी या कामगारांवर उपासमारीची वेळ आली होती. या पार्श्वभूमीवर कामगारांना दिलासा मिळावा, या उद्देशाने जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटनेने पुढाकार घेतला होता.

संघटनेच्या वतीने लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा उपनिबंधक (ऊठ) तसेच माजी सहकार मंत्री दिलीपराव देशमुख आणि आमदार तथा माजी मंत्री अमित देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती. दसरा व दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर बाजार समितीतील माथाडी कामगार, महिला कामगार आणि तोलार यांना राशन किटचे वाटप करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली होती. अखेर जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कामगारांना राशन किटचे वाटप करण्यात आले. या निर्णयामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावेळी जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिक पाडोळे, उपाध्यक्ष सचिन मुंडे, सचिव फरिद हिंगे, कार्याध्यक्ष लखन साबळे, अमोल ढालमारे, राजू साबळे, सिद्धार्थ गायकवाड, मुकुंद माने, नरसिंग तरपे, सिद्धार्थ शेळके आदी उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल लातूर जिल्ह्याचे आमदार तथा माजी मंत्री अमित देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, सचिव व सर्व संचालक मंडळ तसेच जिल्हा उपनिबंधक (ऊठ) यांचे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिक पाडोळे यांनी आभार मानले. कामगारांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सणासुदीच्या काळात मदतीचा हात देण्यात आल्याने कामगार वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत रघुवंश पब्लिक स्कूलच्या U-१४ संघाची दमदार कामगिरी; द्वितीय क्रमांक पटकावला!

लातूर । प्रतिनिधी

शालेय क्रीडा स्पर्धा २०२६ अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत लातूर येथील रघुवंश पब्लिक स्कूलच्या १४ वर्षाखालील (U-14) कबड्डी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्पर्धेदरम्यान रघुवंश पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट चपळाई, आक्रमक खेळ, बचावात्मक कौशल्य, जिद्द आणि सांघिक भावना यांचे दर्शन घडविले. प्रत्येक सामन्यात विजयासाठी सर्वस्व पणाला लावत खेळाडूंनी प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. खेळाडूंच्या एकजुटीमुळे आणि मेहनतीमुळे संघाला तालुकास्तरावर द्वितीय क्रमांकाचे यश मिळवता आले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक एस.आर. वाघमारे सर, संचालक प्रणव वाघमारे सर तसेच क्रीडा शिक्षक अमित पोतदार सर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन लाभले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच क्रीडा क्षेत्रातील सर्वांगीण प्रगतीसाठी रघुवंश पब्लिक स्कूल सातत्याने प्रयत्नशील असून, खेळाडूंना योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन दिले जात आहे. या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे. या यशाबद्दल रघुवंश पब्लिक स्कूलच्या सर्व खेळाडूंचे, मार्गदर्शक शिक्षकांचे आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे यशाची नवनवीन शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. जिद्द, मेहनत आणि सांघिक भावनेचा विजय! रघुवंश पब्लिक स्कूलच्या कबड्डी संघाचे हार्दिक अभिनंदन होत आहे.

लातूर महानगरपालिका अग्निशमन विभागाची उल्लेखनीय कामगिरी; ८ आगीच्या घटनावर यशस्वी नियंत्रण

लातूर । प्रतिनिधी

दिनांक ०८ नोव्हेंबर २०२६ रोजी दीपावली लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने रात्री ०७.३० ते रा. १२.४६ वाजेपर्यंत लातूर शहरातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या वेळेस एकूण ०८ अग्निशमन वर्दी (कॉल) प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या अग्निशमन वर्दीचे ठिकाणनिहाय विवरण खालीलप्रमाणे आहे. लोखंडे गल्ली- पेंट दुकानाला आग, सुभाष चौक- खुल्या प्लॉट ला आग, उद्योग भवन, ट्युशन एरिया- गोडाऊन ला आग, गूळ मार्केट, कचरा संकलन केंद्र- कचऱ्याला आग, संविधान चौक - खुल्या प्लॉटलाग, अरोमा हॉटेलसमोर- फुटवेअर कंपनीला आग, आंबा हनुमान चौक- घराला आग, महिंद्रा शोरूम, हॉटेल अनिल शेजारी- खुल्या प्लॉटलाग सदर सर्व घटनांची माहिती प्राप्त होताच लातूर शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या अधिकारी व जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या संपूर्ण अग्निशमन कार्यवाहीसाठी एकूण ३० अग्निशमन जवान व ०८ अग्निशमन वाहने तैनात करण्यात आली होती. उपलब्ध अग्निशमन वाहने, उपकरणे व साधनसामग्रीच्या सहाय्याने जवानांनी अत्यंत तत्परतेने, समन्वयाने व शर्थीचे प्रयत्न करून सर्व ठिकाणच्या आगींवर यशस्वीरीत्या नियंत्रण मिळविले.

दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाची कु. श्रेया बिरादार लातूर जिल्ह्यात प्रथम!

लातूर । संतोष सोनवणे

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (खउ-ख) मार्फत सप्टेंबर २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या CA Foundation परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, लातूरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रेया बिरादार हिने २५५ गुण मिळवून लातूर जिल्ह्यातून परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक गुण मिळविण्याचा मान पटकावला आहे. तसेच खउ-ख लातूर शाखेच्या गुणवत्ता यादीतही तिने प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी : १.कु. श्रेया बिरादार -२५५ गुण, २.चि.मयूर तुपकरी -२२३ गुण, ३.कु. श्रुती इंगळे -२१० गुण, ४.कु. ममता सोळके - २०९ गुण, ५.कु. सृष्टी गिरवलकर- २०७ गुण, ६.कु. शमिका कुलकर्णी - २०१ गुण, ७.कु. विशाखा चोंडे - २०० गुण मिळवून CA Foundation परीक्षेतील दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचा गुणवत्ता आलेख कायम ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष संजय बोरा, शालेय समिती सदस्य विशाल अग्रवाल, बालकिशन बांगड, आशिष अग्रवाल व दिनेश इन्नानी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख व समन्वयक डॉ. सुभाष मोरे आणि सर्व प्राध्यापक वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



भाजपाची कार्यकर्ता निर्माण पद्धती प्रेरणादायी; संघर्ष योद्धा वडिलांचा मुलगा राष्ट्रीय उपाध्यक्षपदी विराजमान

औसा । बी.डी. उबाळे

भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष लालसिंह आर्य हे संघर्ष, समर्पण आणि कार्यकर्ता वृत्तीचे प्रतीक आहेत. त्यांच्या जीवनाचा प्रवास हा एका सामान्य मजूर कुटुंबातील मुलाने कठोर परिश्रम, चिकाटी आणि देशसेवेच्या भावनेतून राष्ट्रीय पातळीवर पोहोचण्याची प्रेरणादायी कहाणी आहे.

त्यांनी सामाजिक कार्यकर्ता, संघटनात्मक नेतृत्व आणि जनहितासाठी सतत संघर्ष करत भाजपच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदापर्यंत घेऊन आलेले हे प्रवास आज अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

त्यांच्या वडिलांनी १९९२ मध्ये फॅक्टरीत मजूर म्हणून काम केले. १९९६-९७ मध्ये ते भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते म्हणून सक्रिय झाले. २००३ मध्ये ते मध्य प्रदेश विधानसभेत सदस्य झाले. २०१३ मध्ये त्यांनी भोपाळच्या जिल्हा प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली. २०१८ मध्ये त्यांची राज्य संघटनात महत्त्वाची भूमिका राहिली. त्यांनी २०१३ ते २०१८ या काळात संघटनात खूप सक्रियपणे काम केले आणि कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या वाढत्या कार्यामुळे एक नेता म्हणून ओळख निर्माण झाली.



२०१३ मध्ये त्यांना विधानसभा सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर भाजपमध्ये संघटनात्मक काम पाहत त्यांनी राज्यस्तरीय नेतृत्वात आपली छाप पाडली. लालसिंह आर्य हे कार्यकर्ता म्हणून सुरुवातीपासूनच समाजकार्यात सक्रिय होते. त्यांनी ग्रामीण आणि शहरी भागात संघटन वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले. २०१० मध्ये त्यांना राज्य संघटनात महत्त्वाची भूमिका देण्यात आली. २०१८ नंतर त्यांनी मध्य प्रदेश भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी संघटन विस्तार, बूथ व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांमधील समन्वय यावर भर दिला. २०२० मध्ये त्यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली. ही त्यांच्या राजकीय जीवनातील एक मोठी उपलब्धी होती.

त्यांनी अनेक सामाजिक समस्या, शेतकरी, कामगार, वंचित घटक आणि युवा वर्गासाठी आवाज उठवला. त्यांच्या नेतृत्वात भाजपने मध्य प्रदेशमध्ये अनेक महत्त्वपूर्ण यश मिळवले. २०२३ मध्ये त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पुन्हा राष्ट्रीय उपाध्यक्षपदी जबाबदारी देण्यात आली. २०२४ आणि २०२६ च्या निवडणुका काळातही त्यांनी पक्षाच्या संघटनाला मजबूत करण्याच्या महत्त्वाची भूमिका बजावली. लालसिंह आर्य यांचे जीवन हे संघर्ष, सेवा आणि समर्पणाचे उदाहरण आहे. त्यांनी कधीही हार मानली नाही. मजूर वडिलांच्या कष्टातून मिळालेली संस्कार, शिस्त आणि मेहनत यांच्या बळावर त्यांनी राजकारणात उच्च स्थान मिळवले.त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रामाणिकपणा, साधेपणा आणि कार्यकर्त्यांवरील विश्वास हा त्यांचा खरा शक्ती आहे. त्यांना मोठ्या पदापर्यंत पोहोचवणारी ही वाटचाल आजच्या तरुणांसाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे. लालसिंह आर्य यांचे कार्य हे केवळ राजकीय नाही, तर सामाजिक आणि राष्ट्रीय उद्दिष्टाने प्रेरित आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे भाजपला मजबूत संघटन मिळाले आहे आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा राष्ट्रीय पातळीवर आणि पश्चिम बंगाल निवडणूक सहप्रभारी म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली अशी प्रतिक्रिया औसा येथील भूमिपुत्र तथा सोशल मीडिया प्रभारी, महाराष्ट्र प्रदेश, विनोद धर्मु जाधव यांनी व्यक्त केली.

निराधार बालकांसोबत साजरी झाली माणुसकीची दिवाळी!

लातूरच्या वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाचा हृदयस्पर्शी उपक्रम

लातूर । संतोष सोनवणे

दिवाळीच्या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने वसुंधरा प्रतिष्ठान संचलित वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने खुशी ग्राम येथे सलग अकराव्या वर्षी 'माणुसकीची दिवाळी' हा उपक्रम राबविण्यात आला. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी आयोजित या उपक्रमात खुशी ग्राममधील अनाथ व निराधार बालकांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. बालकांना नवीन कपडे, मिठाई, फटाके आणि दिवाळी सेलिब्रेशन पॅक भेट देऊन मंडळाच्या सदस्यांनी त्यांच्या आनंदात सहभाग नोंदविला.

सण-उत्सव हे सामाजिक एकोपा आणि माणुसकीची भावना वृद्धिंगत करण्याचे माध्यम असतात. मात्र, अनेकदा समाजातील काही घटकांपर्यंत सणांचा आनंद पोहोचत नाही. ही बाब लक्षात घेऊन वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाने 'माणुसकीची दिवाळी' हा उपक्रम सुरू केला. खुशी ग्राम ही संस्था अनाथ व निराधार बालकांच्या संगोपनाचे कार्य करते. याच संस्थेची निवड करून मंडळाच्या वतीने दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने बालकांसोबत हा उत्सव साजरा केला जातो. यंदा या उपक्रमाचे अकरावे वर्ष होते.



लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य खुशी ग्राम येथे एकत्र आले. बालकांना दिवाळीनिमित्त नवीन कपडे, मिठाई, फटाके आणि दिवाळी सेलिब्रेशन पॅक देण्यात आले. भेटवस्तूंच्या वाटपानंतर बालकांसोबत दिवाळीचा उत्सव साजरा करण्यात आला. या उपक्रमामुळे बालकांनाही दिवाळीच्या सणात सहभागी होण्याची संधी मिळाली. सामाजिक उपक्रमांमध्ये केवळ आर्थिक मदत किंवा वस्तूंचे वाटप न करता प्रत्यक्ष सहवासातून आनंद वाटून घेण्याचा मंडळाचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.

वसुंधरा प्रतिष्ठानच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासोबतच सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जाते. वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधला जातो. 'माणुसकीची दिवाळी' हा उपक्रम त्याच सामाजिक बांधिलकीचा भाग असून, गेल्या अकरा वर्षांपासून त्यात सातत्य राखण्यात आले आहे. या उपक्रमास सिनेसृष्टीतील लेखक व निर्माते श्रीनिवास कुलकर्णी, व्यापारी धीरज शर्मा, सौ. निशा शर्मा, वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा, उपाध्यक्ष रामेश्वर बावळे, मुख्य समन्वयक राहुल माशाळकर, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, सदस्य दत्ता जाधव, राहुल औरादे, आदित्य कुलकर्णी तसेच खुशी ग्रामचे संचालक मधुकरराव सोनवणे आणि वर्षाताई सोनवणे यांची उपस्थिती होती.

हीच आमची दिवाळी, हाच आमचा सण : राहुल माशाळकर

दिवाळीचा आनंद केवळ आपल्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि निराधार बालकांसोबत वाटून घेणे, हीच 'माणुसकीची दिवाळी' या उपक्रमामागील भूमिका आहे. खुशी ग्राममधील बालकांसोबत दिवाळी साजरी करताना त्यांच्या आनंदात सहभागी होता येते, याचे आम्हाला समाधान आहे. गेल्या अकरा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने सुरू असून, भविष्यातही ही परंपरा कायम ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील. या बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच आमच्यासाठी दिवाळीचा खरा आनंद आहे, अशी भावना श्री. राहुल माशाळकर यांनी व्यक्त केल.

Page 3_Layout 1 11/10/2026 12:57 AM Page 1

डॉ.स्वरूपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली झाशी येथील मजूर कुटुंबांना फराळाचे वाटप

धारूर/अतूल शिनगारे

धारूर येथील ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या दुरुस्ती व संवर्धनाचे काम सध्या सुरू आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूप सिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळी सणाचे अवचित साधून फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कामासाठी झाशी येथील मजूर बांधव आपल्या कुटुंबीयांसह धारूर येथे आले आहेत. भारतीय जनता पार्टीच्या वतीने या मजूर बांधवांच्या कुटुंबीयांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देत



सणाचा आनंद द्विगुणित करण्यात आला. ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या दुरुस्ती व संवर्धनाच्या कामात योगदान देणाऱ्या या मजूर बांधवांना दिवाळीच्या सणात आपुलकीचा आधार मिळावा, या उद्देशाने भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हा उपक्रम राबविला. यावेळी मजूर बांधवांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमावेळी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी, दत्ताभाऊ धोत्रे, ॲड. मोहन भोसले, पत्रकार संघाचे अध्यक्ष अतुल शिनगारे , नगरसेवक विनायक शिनगारे,सुरेश लोकरे,सचिन दुबे, संदीप शिनगारे विलास मैंद, कपिल समर्थ ,शाहबाज पठाण यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी परराज्यातून आलेल्या मजूर बांधवांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेत भाजपच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.



















टि.सी.हरवला आहे

किशोर यज्ञकांत नागरगोजे या नावाची १० पास टी.सी. सिरसाळा ते परळी प्रवासादरम्यान गहाळ झाली. तरी कोणास टी.सी. आढळून आल्यास त्वरीत संपर्क साधाव

संपर्क

मो. ९३७३९२९२३४



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.४

रांजणी येथे भगवान महावीर निर्वाण दिन साजरा

रांजणी । प्रतिनिधी
घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील महावीर जैन मंदिरात सोमवारी दि.९ नोव्हेंबर २०२६ रोजी भगवान महावीर यांचा पावन निर्वाण दिन सर्व जैन समाज बांधवांच्या वतीने अत्यंत भक्ती वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे सोमवारी अमावस्याच्या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर भगवान महावीरांच्या मूर्तीला पवित्र जलाभिषेक व पूजन केल्यानंतर सामूहिक नमोकार मंत्राच्या उच्चारात भगवंताच्या चरणी निर्वाण लाडू अर्पण करण्यात आला.
यावेळी सामुदायिक आरती घेण्यात आली. जियो और जीने दो, जगा आणि जगू द्या, महावीर भगवान की जय अहिंसा परमो धर्म की जय यांचा गजर करण्यात आला. यावेळी महावीर जैन मंदिरात सर्वश्री विजयकुमार खुळे, अशोक खुळे, महावीर घोडके, संतोष गोसावी, आकाश खुळे, स्वप्निल गोसावी, प्रतीक खुळे, कुलदीप खुळे, अजित घोडके, नेमिनाथ खुळे, श्रीमती शकुंतलाबाई खुळे, सुनीता खुळे, नंदा खुळे, सुनीता गोसावी, सुनंदा घोडके, अंजली गोसावी, पूजा घोडके यांच्यासह सर्व जैन समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन खंबीरपणे पाठिशी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

लना । प्रतिनिधी
राज्यात दुष्काळाचे संकट निर्माण झाले असले, तरी शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असून, त्यांना आवश्यक ती सर्व मदत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिली जाईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना तालुक्यातील भिलपुरी येथे दिली. जालना तालुक्यातील भिलपुरी येथील दुष्काळग्रस्त शेतकरी अंबादास तांगडे यांच्या घरी भेट देऊन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी तांगडे कुटुंबीयांशी संवाद साधत शेतीची परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची माहिती घेतली. याप्रसंगी त्यांनी कुटुंबासोबत पारंपरिक बेसन, बाजरीची भाकरी, गावरान ठेचा आणि चटणी अशा ग्रामीण जेवणाचा आस्वाद घेतला.
यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, मी देखील शेतकरी कुटुंबातील आहे. त्यामुळे तांगडे यांच्या घरी आल्यासारखे वाटत नसून स्वतःच्याच घरी आल्याची भावना आहे. शेतकऱ्यांवर मोठे संकट आले असून, या परिस्थितीत समाजातील प्रत्येकाने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे. शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला असून, अनेक शेतकऱ्यांच्या खात्यांत ही रक्कम जमा झाली आहे. तसेच दुष्काळ जाहीर केल्यानंतर बारा कलमी सवलतींची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नुकसान भरपाईसह पीक कर्जाचे पुनर्गठन, सक्तीच्या वसुलीला स्थगिती,



शैक्षणिक शुल्कात सवलत आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.
अंबादास तांगडे यांच्याकडे केवळ एक एकर शेती असून, पत्नी मंदाबाई, दोन मुली, एक मुलगा आणि आई अशा कुटुंबाचा उदरनिर्वाह या शेतीवर अवलंबून आहे. कुटुंबाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर शिंदे यांनी तांगडे यांच्या मुलीशी संवाद साधला. तिला भविष्यात पोलीस अधिकारी व्हायचे असल्याचे समजल्यानंतर तिच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची संपूर्ण जबाबदारी स्वीकारत असल्याचे त्यांनी जाहीर केले. याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील ज्या शेतकरी कुटुंबांतील मुलींचे विवाह ठरले आहेत, अशा कुटुंबांची माहिती संकलित करून सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा निर्णयही त्यांनी यावेळी जाहीर केला. शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकली आणि गरजू कुटुंबांना दिवाळीचा शिधा देण्याचे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.
आगामी पावसाळ्यापर्यंत दुष्काळग्रस्त भागात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी, चारा आणि अन्नधान्य उपलब्ध राहावे, यासाठी शासन नियोजन करीत आहे. केंद्र सरकारही महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकरी हा शासनाच्या तिजोरीवरील पहिला हक्कदार असून, त्याला मदत करताना सरकार कोणतीही कमतरता ठेवणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी धीर सोडू नये आणि कोणताही टोकाचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.
भाऊबीजेनिमित्त मंदाबाई तांगडे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे औक्षण केले. त्यानंतर शिंदे यांनी तांगडे कुटुंबातील सर्व सदस्यांना कपडे भेट दिले. यावेळी मंदाबाई यांनी त्यांना दहा किलो ज्वारी आणि दहा किलो बाजरी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. शासनाचे प्रमुख पदावरील व्यक्ती आपल्या घरी येऊन सुख-दुःखाची विचारपूस करतात, ही समाधानाची बाब असल्याची भावना अंबादास तांगडे यांनी व्यक्त केली.
यानंतर मौजपुरी गावातील महादेव मंदिर परिसरात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकरी, शेतमजूर आणि महिलांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत दिवाळीचा फराळ व शिधा देऊन महिलांचा सन्मान केला. या वेळी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, उद्योगमंत्री उदय सामंत, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खासदार संदीपान भुमरे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार हिकमत उढाण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शेतकरी, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त मराठवाड्यात शिवसेनेतर्फेसाजरी झाली 'दिवाळी' ; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जालना दौऱ्यात शेतकऱ्यांशी संवाद साधत दिलासा

जालना । प्रतिनिधी
राज्यभरात एका बाजूला दुष्काळी परिस्थिती असताना, मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी आणि त्यांच्यासोबत असल्याची भावना कृतीतून दाखवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने जालना जिल्ह्यातील भिलपुरी गावात अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी करण्यात आली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी स्वतः भिलपुरी येथे भेट देत दुष्काळग्रस्त कुटुंबांसोबत दिवाळी साजरी केली. या दौऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भिलपुरी येथील बांगडे कुटुंबीय आणि अंबादास किसनराव तांगडे यांच्या घरी सहकुटुंब दुपारचे भोजन घेतले. या संवेदनशील उपक्रमामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा मानसिक दिलासा मिळाला असून, शेतकऱ्यांनीही त्यांचे उत्साहात स्वागत केले.



या दौऱ्यात उपमुख्यमंत्र्यांसोबत जालना जिल्ह्याचे आमदार अर्जुनराव खोतकर, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, शिवसेनेचे वरिष्ठ नेते आनंद परांजपे यांच्यासह पक्षाची संपूर्ण टीम मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी उपस्थित होती. दौऱ्यादरम्यान स्थानिक शेतकऱ्यांनी दुष्काळग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी व इतर शेतमजुरीची कामे तत्काळ सुरू करण्याची मागणी केली. तसेच, विविध संस्थांच्या वतीने नेत्यांना निवेदने देण्यात आली.
महाराष्ट्र लोकविकास मंच व स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियान: संचालक मिलिंद सावंत यांनी मराठवाड्यात 'मुख्यमंत्री पशुधन योजना' आणि 'विकसित भारत रोजगार हमी कार्यक्रम' प्रभावीपणे राबविण्याची मागणी केली. विविध संघटना व प्रतिनिधी: युवाशक्ती सेवाभावी संस्थेचे अमोल खरात, बाबासाहेब आंबेडकर संस्थेचे प्राध्यापक गरुड, शाहीर दीपक हिवाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश गोरे, सरपंच राजेश जराड, सुरेश खंडाळे यांच्यासह रामनगर परिसरातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
मराठवाडा व विदर्भात दुष्काळ निर्मूलनाची प्रभावी कार्ये करण्यासाठी शासनाकडे मुबलक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन या वेळी देण्यात आले. अर्जुनराव खोतकर यांच्यासह पक्षाचे सर्व सहकारी दुष्काळ निर्मूलनासाठी कटिबद्ध असून शासन सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नेत्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

चंदनझिरा पोलिसांची धडक कारवाई: राजूर रोडवरील राधाकृष्ण मंगल कार्यालयात सुरू असलेल्या अवैध वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

जालना । ज्ञानेश्वर साळुंके
शहरातील राजूर रोडवरील राधाकृष्ण मंगल कार्यालयात सुरू असलेल्या अवैध वेश्याव्यवसायावर चंदनझिरा पोलिसांनी छापा टाकून मोठा पर्दाफाश केला आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन महिलांची सुटका केली असून एका ग्राहकाला ताब्यात घेतले आहे. तसेच वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या मुख्य संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ४७,४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
गोपनीय माहितीवरून सापळा:जालना शहर व परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. याच अनुषंगाने दिनांक ०९ नोव्हेंबर २०२६ रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना जालना ते राजूर रोडवरील एका मंगल कार्यालयात अवैधरित्या वेश्याव्यवसाय सुरू असल्याची



खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकण्याचे नियोजन केले. यासाठी पोलिसांनी एका इसमास बनावट ग्राहक बनवून संबंधित ठिकाणी पाठवले. बनावट ग्राहकाने मंगल कार्यालयात जाऊन वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री करून, महिलांची मागणी करत व्यवहार ठरल्यानंतर पोलिसांना ठरल्याप्रमाणे पूर्वकल्पना दिली.
दोन खोल्यांवर छापा आणि आरोपी गजाआड:
पोलिसांचे पथक मंगल कार्यालयाच्या परिसरात अगोदरच गुप्त रित्या तैनात होते. बनावट ग्राहकाकडून इशारा मिळताच पोलीस अधिकारी, अंमलदार व पंच यांनी संबंधित मंगल कार्यालयात प्रवेश करून अचानक छापा टाकला. या कारवाई दरम्यान कार्यालयातील दोन स्वतंत्र खोल्यांमध्ये तीन महिला व एक ग्राहक आढळून आले, तर कार्यालयाच्या काउंटरवर एक इसम उपस्थित असल्याचे दिसून आले.
पोलिसांनी संबंधित इसमाला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता, त्याचे नाव दिलीप दौलतराव रंधवे (वय ४० वर्षे, रा. इंदिरानगर, जुना जालना) असे असल्याचे निष्पन्न झाले. छाप्यादरम्यान सापडलेल्या महिलांकडे चौकशी केली असता, संबंधित इसम त्यांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच घटनास्थळी आढळलेल्या एका ग्राहकानेही वेश्यागमनासाठी आल्याची व त्यासाठी पैसे दिल्याची कबुली दिली.
मुद्देमाल जप्त व पुढील तपास
सदर कारवाई दरम्यान पोलिसांनी पंचांसमक्ष रोख रक्कम, मोबाईल फोन, सौंदर्य प्रसाधने व इतर साहित्य असा एकूण ४७,४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात आरोपी दिलीप दौलतराव रंधवे याच्याविरुद्ध स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९५६ (Immoral Traffic (Prevention) Act) मधील कलम ३, ४, ५, ६ व ७ अन्वे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ए. एन. खरात करत आहेत.
महिला व मुलींचे शोषण, मानवी तस्करी आणि अवैध वेश्याव्यवसाय यांसारख्या गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून नागरिकांनी अशा अवैध गतिविधींची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्राप्त माहितीच्या आधारे कायदेशीर तरतुदीनुसार कठोर कारवाई केली जाईल. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, सपोनि अशोक खरात, पोलीस उपनिरीक्षक मारीयो स्कॉट, पोहेकॉ प्रशांत देशमुख, संतोष वनवे, अनुराधा बांडे व चालक पोउपनि संग्रामसिंग ठाकुर यांच्या पथकाने पार पाडली.

लक्ष्मीपूजनानिमित्त महापौर सय्यद इकबाल परभणीच्या बाजारपेठेत; व्यापाऱ्यांशी साधला संवाद

परभणी । प्रतिनिधी
दीपावली आणि लक्ष्मीपूजनाच्या मंगलमय पर्वानिमित्त परभणी शहराचे महापौर सय्यद इकबाल यांनी रविवारी सायंकाळी शहरातील मुख्य बाजारपेठेला भेट देत व्यापाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. बाजारपेठेतील विविध व्यापारी प्रतिष्ठानांना भेटी देत त्यांनी व्यापारी बांधवांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. महापौरांनी अचानक दुकानांमध्ये येऊन संवाद साधल्याने व्यापारी आश्चर्यचकित झाले. त्यांच्या या अनौपचारिक भेटीमुळे व्यापारी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात आले.
परभणी शहरात दीपावलीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असून, रविवारी सायंकाळी लक्ष्मीपूजनाचा सोहळा पार पडला. या पार्श्वभूमीवर महापौर सय्यद इकबाल यांनी शहरातील व्यापाऱ्यांच्या भेटीगाठी घेण्याचा उपक्रम राबविला. नानलपेठ परिसरातून त्यांनी या भेटीला सुरुवात केली.
छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि सुभाष रोड परिसरातील व्यापारी प्रतिष्ठानांना भेटी देत महापौरांनी व्यापाऱ्यांशी संवाद साधला. प्रत्येक दुकानात जाऊन व्यापारी बांधवांना दीपावलीच्या शुभेच्छा देतानाच त्यांच्या व्यवसायाची माहिती घेतली. सणाच्या काळात बाजारपेठेत असलेली गर्दी, व्यापारी व्यवहार आणि ग्राहकांची वर्दळ याबाबतही त्यांनी चर्चा केली.

जालना–अंबड महामार्गावर अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट; पारनेर पेट्रोल पंप ते शेवगा पाटीपर्यंत राजरोस धंदे सुरू

अंबड । प्रतिनिधी
अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंबड-जालना महामार्गावर अवैध देशी-विदेशी दारूची विक्री दिवसेंदिवस वाढत चालली असून, महामार्गावरील पारनेर पेट्रोल पंप, लालवाडी, कर्जत फाटा, शेवगा पाटी, धनगर पिंपरी आणि सारंगपूर या परिसरात हा गोरखधंदा बिनधास्त सुरू असल्याचे समोर आले आहे. शेवगा पाटी, धनगर पिंपरी, सारंगपूर, हरतखेडा, वाघलखेडा, हस्तपोखरी आणि कर्जत फाटा हा परिसर शेवगा फाटा हा एक मध्यवर्ती ठिकाण व मोठी बाजारपेठ म्हणून ओळखला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या पट्ट्यात बेकायदेशीर दारूचा व्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.
तरुण पिढी अंधारात, संसार उद्ध्वस्त
या अवैध दारू विक्रीमुळे परिसरातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून अनेकांचे आयुष्य आणि भविष्य अंधारात चालले आहे. दारूच्या व्यसनापोटी अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत. विशेषतः महिला आणि मुर्लीना शिक्षणासाठी किंवा कामानिमित्त या मार्गावरून प्रवास करताना असुरक्षित वाटत असून मोठी भीती निर्माण झाली आहे. वाढत्या अवैध धंद्यांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.
मोटरसायकलवरून दारूची होम डिलिव्हरी
ग्रामीण भागात मोटरसायकलवरून देशी दारूचे बॉक्स पार्सल करून घरपोच किंवा उघडपणे विक्री केले जात आहे. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, खेड्यापाड्यांमध्ये अवैध देशी दारूच्या या महापुरामुळे महिला वर्ग आणि ग्रामस्थ अत्यंत त्रस्त झाले आहेत असा सूर नागरिकांमधून उमटत आहे.
प्रशासन कठोर कारवाई करणार का?
या खुलेआम सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीला अंकुश मिळण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने या प्रकरणी गांभीर्याने लक्ष घालावे; तसेच नियमांचे उल्लंघन करून अवैध रित्या माल पुरवठा करणारे आणि स्थानिक विनापरवाना विक्रेत्यांवर धडक व कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे. आता या बेकायदेशीर साखळीवर प्रशासन कधी आणि काय ठोस कारवाई करणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

'कामनगाव'च्या मातीत होणार राज्यातील दुसरा पाणी सप्ताह; सेवा समर्पण परिवार अन् ग्रामस्थांचा पुढाकार

भोकर । प्रतिनिधी
पाणी टंचाईला काही प्रमाणात आळा बसावा, गाव शिवारात पडणारे पाणी गाव शिवारातच मुरावे हा हेतू डोळ्यासमोर सेवा समर्पण परिवार व कामनगाव च्या ग्रामस्थांनी राज्यातील दुसरा पाणी सप्ताह साजरा करणार आहेत. या पाणी सप्ताहाचे उद्घाटन दि.१५ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार असून या सप्ताहात पाण्यासाठी जागर घालण्यात येणार आहे.
शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी मागील अनेक वर्षापासून रासायनिक खतांचा वापर बेसुमार करण्यात आला. याचा परिणाम आता दिसू लागला आहे. अति रासायनिक खतांचा वापर झाल्याने जमिनीतील सेंद्रिय घटक कमी झाले आहेत. यामुळे जमीन टणक झाली आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता ही कमी झाली. यामुळे पाऊस मोठ्या प्रमाणात झाला तरी हे पाणी मोठ्या प्रमाणात जमीनीत मुरत नाही. भोकर तालुक्याची पावसाची सर्वसाधारण सरासरी ९६३ मिमी पाऊस आहे. हे वर्ष वगळता मागील तीन वर्षात सरासरी पेक्षा जास्त पाऊस होवून सुद्धा पाणी निर्माण झाली. सध्या पाणी वापरात कितीतरी पटीने वाढ झाली आहे.
पाण्याचा वापर प्रचंड वाढलेला आहे. यामुळे भूजल पातळी दरवर्षी खालावत आहे. यावर्षी तर १२ फूट पाणी पातळीत घट झाली. यामुळे उन्हाळ्यात जमिनीच्या अंतर्गत खोलवर असलेले क्षारयुक्त पाणी वापरावे लागते. यावर एकच उपाय म्हणजे जलसंधारण ची कामे हाती घ्यावी लागणार आहे. जिथे जिथे शक्य आहे त्या ठिकाणी पावसाचा थेंब न थेंब अडविणे व जिरवणे आवश्यक आहे.

मंठ्यात शिवसेनेत अंतर्गत असंतोषाचा उद्रेक!

एक हजारांहून अधिक पदाधिकारी-कार्यकर्ते सामूहिक राजीनाम्याच्या तयारीत

मंठा । प्रतिनिधी
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जालना दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मंठा आणि परतूर तालुक्यातील शिवसेनेत मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. परतूर-मंठा व नेर-सेवली विधानसभा मतदारसंघातील तालुकाप्रमुख उदयसिंह प्रल्हादराव बोराडे यांच्या नेतृत्वाखाली एक हजारांहून अधिक पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी पक्षाच्या पदांसह प्राथमिक सदस्यत्वाचा सामूहिक राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हास्तरीय नेतृत्वाच्या कथित मनमानी कारभाराविरोधात उफाळलेला हा असंतोष आता थेट पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे.
पक्षवाढीसाठी झटले, मात्र सन्मान मिळाला नाही!
एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सुरुवातीच्या काळात शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये उदयसिंह बोराडे यांचा समावेश होता. गावोगावी शाखा स्थापन करणे, सदस्य नोंदणी, कार्यकर्त्यांची फळी उभी करणे आणि संघटनात्मक विस्तारासाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र, पक्षासाठी वेळ आणि श्रम खर्ची घालणाऱ्या कार्यकर्त्यांनाच संघटनेत अपेक्षित सन्मान मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.
जिल्हाप्रमुखांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप!
जिल्हाप्रमुख आसाराम बोराडे उर्फ ए. जे. बोराडे यांच्या कार्यपद्धतीवर उदयसिंह बोराडे यांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेणे, संघटनात्मक कार्यक्रमांत डावलणे, निवडक लोकांनाच महत्त्व देणे, गटबाजीला प्रोत्साहन मिळणे आणि तळागाळात काम करणाऱ्या शिवसैनिकांच्या योगदानाकडे दुर्लक्ष होणे, असे आरोप त्यांनी केले आहेत.
विशेष म्हणजे, ठाकरे गटात असतानाही



अशाच कार्यपद्धतीमुळे अडचणी निर्माण झाल्या आणि शिंदे गटात प्रवेश केल्यानंतरही परिस्थितीत बदल झाला नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमधील नाराजी आता सामूहिक राजीनाम्याच्या निर्णयापर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे.
'आनंदाचा शिधा' वाटपावरूनही वाद!
दुष्काळग्रस्त आणि गरजू नागरिकांसाठी पाठविण्यात आलेल्या 'आनंदाचा शिधा' वाटपावरूनही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. उदयसिंह बोराडे यांच्या आरोपानुसार, जिल्हाप्रमुखांनी तालुकाप्रमुख आणि विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता आपल्या मर्जीतील निवडक कार्यकर्ते, महिला व नातेवाईकांना शिध्याचे वाटप केले. त्यामुळे खऱ्या गरजू, गोरगरीब आणि निराधार महिलांना अपेक्षित लाभ मिळाला नसल्याची तक्रार त्यांनी केली आहे. या प्रकरणाची लाभार्थीनिहाय चौकशी करून शिधा नेमका कोणाला आणि कोणत्या निकषांवर वितरित करण्यात आला, हे स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.
नगरपंचायत अन् बाजार समितीतील घडामोडींवरही प्रश्नचिन्ह!
मंठा नगरपंचायतीतील शिवसेनेची सत्ता जाणे, नगरसेवकांचे पक्षापासून दूर जाणे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीत महायुतीच्या माध्यमातून निवडून आलेल्या संचालकांची पक्षापासून फारकत, या राजकीय घडामोडींचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. संघटनेतील नाराजीची कारणे शोधून कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप बोराडे यांनी केला आहे.
तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांपासून शाखाप्रमुखांपर्यंत नाराजी!
या सामूहिक राजीनाम्याच्या निर्णयात विविध आघाड्यांचे तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख, तालुका संघटक, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, शहरप्रमुख, उपशहरप्रमुख, शाखाप्रमुख तसेच ग्रामीण व शहरी भागातील पदाधिकारी आणि शिवसैनिक सहभागी असल्याचे सांगण्यात येत आहे. एक हजारांहून अधिक कार्यकर्त्यांच्या या निर्णयामुळे मंठा-परतूर परिसरातील शिवसेनेतील संघटनात्मक नाराजी चर्चेचा विषय ठरली आहे.
एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे यांच्या हस्तक्षेपाची मागणी!
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जालना दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उदयसिंह बोराडे यांनी एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना या प्रकरणात थेट हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यातील संघटनात्मक परिस्थितीची स्वतंत्र चौकशी करावी, आनंदाचा शिधा वाटपातील तक्रारींची तपासणी करावी आणि नाराज पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. आम्ही एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाच्या विरोधात नाही. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवूनच शिवसेनेत आलो आहोत. आमचा विरोध स्थानिक पातळीवरील मनमानी कार्यपद्धतीला आहे. पक्षासाठी मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांना सन्मान मिळत नसेल, तर पदावर राहण्यात अर्थ नाही, अशी स्पष्ट भूमिका उदयसिंह बोराडे यांनी मांडली.
आता वरिष्ठ नेतृत्व काय निर्णय घेणार?
एकीकडे पक्षविस्तार आणि संघटनात्मक मजबुतीच्या चर्चा सुरू असताना दुसरीकडे एक हजारांहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्याचा निर्णय घेतल्याची घटना पक्षांतर्गत असंतोष अधोरेखित करणारी ठरत आहे. हा असंतोष केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित राहणार की वरिष्ठ नेतृत्व त्याची दखल घेऊन संघटनात्मक बदल करणार, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

प्रशांत राम लांडगेची एमबीबीएससाठी निवड; मथुरेच्या नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश!

पालम । अनिस खुरेशी



पालम तालुक्यातील मौजे चोरवड येथील हिरकणी सीबीएसई स्कूल, चोरवड येथील होतकरू विद्यार्थी प्रशांत राम लांडगे याने वैद्यकीय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्याची मथुरा येथील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

शेतकरी कुटुंबातील मुलाची डॉक्टर होण्याकडे झेप!

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या प्रशांतने कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातून पुढे येत डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या प्रशांतच्या यशाने संपूर्ण चोरवड गावासह पालम तालुक्याची मान उंचावली आहे.

हिरकणी सीबीएसई स्कूलची यशस्वी परंपरा!

हिरकणी सीबीएसई स्कूलमधील विद्यार्थी दरवर्षी चइइड, इ-चड यांसारख्या वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी पात्र होत आहेत. शिक्षकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध शिक्षण आणि पालकांचा विश्वास यामुळे शाळेने ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रशांतच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे आई-वडील, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून अभिनंदन केले जात आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या राष्ट्रीय निकालाकडे पिंपरी चिंचवडकरांचे लक्ष

स्वच्छतेतील कामगिरीचे राष्ट्रीय मानांकन ११ नोव्हेंबरला स्पष्ट होणार

पिंपरी । प्रतिनिधी

स्वच्छ भारत अभियान (शहरी) अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६'च्या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण येत्या ११ नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या सोहळ्यात देशभरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांना आणि संस्थांना सन्मानित करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सर्वेक्षणांतर्गत केलेल्या कामगिरीचा राष्ट्रीय स्तरावरील निकाल काय लागतो, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने आयोजित या सोहळ्यास केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल आणि राज्यमंत्री तोखन साहू उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११.३० वाजता पुरस्कार वितरण कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे.

स्वच्छता व्यवस्थापनाच्या बळकटीकरणासाठी विविध उपक्रम

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. घरोघरी कचरा संकलन, स्रोतावर कचऱ्याचे विलगीकरण, ओल्या व सुक्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया, सार्वजनिक स्वच्छतागृहांचे व्यवस्थापन, स्वच्छता विषयक नावीन्यपूर्ण उपक्रम, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नागरिकांचा सहभाग या घटकांवर विशेष भर देण्यात आला आहे.

स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने विविध विभागांमध्ये समन्वय साधून निर्धारित निकषांनुसार कामकाजाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली. स्वच्छता सेवक, अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिकांच्या सहभागातून शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, स्वच्छ सर्वेक्षणातील कामगिरी ही महापालिका प्रशासनाच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीची, प्रभावी अंमलबजावणीची आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाची पावती आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नावीन्यपूर्ण उपक्रम, विभागीय समन्वय आणि सातत्यपूर्ण जनजागृती यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे. या प्रक्रियेत स्वच्छता सेवक आणि नागरिकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय स्तरावरील मानांकन ही केवळ स्पर्धेतील कामगिरी नसून, शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी मिळणारी प्रेरणा आहे. भविष्यातही स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहर निर्माण करण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे.

स्वच्छतेतील राष्ट्रीय क्रमवारी बाबत पिंपरी चिंचवडमध्ये उत्सुकता

यंदाच्या स्वच्छ सर्वेक्षणात विविध श्रेणींमध्ये ५७ हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. विविध शहरांचे मानांकन, क्रमवारी आणि पुरस्कारांचे स्वरूप यांची अधिकृत घोषणा पुरस्कार वितरण सोहळ्यात केली जाणार आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्वच्छता विषयक कामगिरीला राष्ट्रीय स्तरावर कोणते स्थान प्राप्त होते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.




साई मेरीगोल्ड सोसायटीतील फ्लॅटला आग; आगीदरम्यान गॅस सिलिंडरचा स्फोट

अग्निशमन दलाकडून आगीवर तातडीने नियंत्रण आणि नागरिकांची सुखरूप सुटका

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपळे सौदागर येथील साई मेरीगोल्ड सोसायटीमधील ए-७०४ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये आग लागल्याची घटना घडली. आगीचे मूळ कारण अद्याप स्पष्ट नसले तरी प्राप्त माहितीनुसार, बाल्कनीतून सुरू झालेली आग काही वेळातच घरातील इन्व्हर्टर बॅटरी, एसी, टीव्ही आणि इतर साहित्यापर्यंत पसरली. याच दरम्यान घरातील गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जवानांनी नागरिकांची सुखरूप सुटका करून पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळविले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून कोणीही जखमी झालेले नाही.



सदर घटनेत एसी कॉम्प्रेसर, टीव्ही, इन्व्हर्टर बॅटरी, विद्युत वायरिंग तसेच इतर घरगुती साहित्याचे नुकसान झाले. विशेषतः एसी कॉम्प्रेसर आणि टीव्हीला भीषण आग लागली होती. घटनेची वर्दी मिळताच रहाटणी उप अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नेहरूनगर अग्निशमन केंद्र आणि मुख्य अग्निशमन केंद्रातील पथकांचीही मदत घेण्यात आली. अग्निशमन जवानांनी होजरील होज आणि होजच्या साहाय्याने पाण्याचा मारा करून फ्लॅटमधील आग विझविण्याची कार्यवाही केली. आग पूर्णपणे विझविल्यानंतर जवानांनी घटनास्थळाची पाहणी केली. परिसरात पुन्हा आग लागण्याचा किंवा अन्य कोणताही धोका नसल्याची खात्री करून अग्निशमन दलाने घटनास्थळ सोडले. या घटनेत फ्लॅटमधील साहित्याचे नुकसान झाले असले तरी कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही.

सणासुदीच्या काळात घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करताना नागरिकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. गॅस गळतीचा संशय आल्यास विद्युत स्विच सुरू किंवा बंद करू नयेत, आग किंवा ठिणगी निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. गॅसचा मुख्य व्हॉल्व्ह सुरक्षितपणे बंद करून दरवाजे व खिडक्या उघडाव्यात आणि तातडीने अग्निशमन विभागाशी १०१ किंवा ७०३०१०८९९१ (मुख्य अग्निशमन केंद्र, पिंपरी) या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांसोबत ग्रामविकास प्रतिष्ठानने साजरी केली दिवाळी; ९० कुटुंबांना स्नेहभेट

इंदापूर । गणेश धनवडे



ऊसतोड कामगारांचे ऊस शेती आणि साखर उद्योगातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कष्टाचा सन्मान करत त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेण्याच्या उद्देशाने इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी (दि. ७) निमसाखर ता. इंदापूर येथे दिवाळीपूर्व स्नेहभेट उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे सचिव वीरसिंह रणसिंग यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविणे, तसेच त्यांच्या श्रमाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. या उपक्रमांतर्गत उपस्थित ९० ऊसतोड कामगार कुटुंबांना इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आनंदी रणसिंग आणि विश्वस्त सौ. राही रणसिंग यांच्या हस्ते उटणे, शिकेकाई, अत्तर आणि दिवाळीचा फराळ स्नेहभेट म्हणून देण्यात आला. सणाच्या निमित्ताने मिळालेल्या या भेटीमुळे कामगार कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

ऊसतोड कामगारांच्या घामातून साखर उद्योगाची चाके फिरतात. मात्र, त्यांच्या कुटुंबीयांच्या आनंदाचा विचार अनेकदा दुर्लक्षित राहतो. अशा परिस्थितीत प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपत राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर गुळीग, डॉ.प्रशांत शिंदे, प्रा. राजेंद्रकुमार डांगे, डॉ.तेजश्री हुंबे, डॉ.योगेश खरात, प्रा. ज्ञानेश गवळी, डॉ.बबन साळवे, प्रा.सोनाली चव्हाण, प्रा. सुजाता निंबाळकर, प्रा.नितीन रुपनवर, प्रा. अभिजीत शिंगाडे, सुभाष भंडलकर आदी उपस्थित होते.

संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत; महंत कबीरदास महाराजांच्या हस्ते नागरी सत्कार

पोहरादेवी । प्रतिनिधी



संत नागोजी नपते पाटील व संत सेवालाल महाराज यांच्या पावन नगरीत म्हणजेच तीर्थक्षेत्र पोहरादेवी गडावर मराठा आरक्षणाचे संघर्षयोद्धा माननीय मनोजदादा जरांगे पाटील यांचे आगमन झाले. मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळवून देण्यासाठी त्यांनी उभारलेल्या ऐतिहासिक लढ्याची दखल घेत, विजय अनंतकुमार पाटील यांच्या प्रमुख पुढाकाराने आणि उपस्थितीत गडावर संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी देवी सेवादास महाराज संस्थान ट्रस्टचे भावी अध्यक्ष महंत कबीरदास महाराज यांच्या हस्ते मनोजदादा जरांगे पाटील यांना शाल, श्रीफळ आणि संत सेवालाल महाराज यांची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात जगदीश महाराज सर यांनी शब्दसुमनांनी स्वागत करून केली. मराठा व बहुजन समाजातील सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव दृढ राहावा, यासाठी विजय अनंतकुमार पाटील यांनीही यावेळी संवाद साधत या भेटीचे महत्त्व अधोरेखित केले.

संत नागोजी नपते पाटील व संत सेवालाल महाराज यांच्या पावन भूमीत संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. या गौरव सोहळ्याला विजय अनंतकुमार पाटील, माजी पंचायत समिती सदस्य गजानन राऊत, गजानन खंडारे, विनोद महाराज, अनिल नाईक, बाळू देहधडे, गोविंद महाराज, श्रावण मिटकर, श्याम राठोड यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंद्रायणी नदीपात्रातील राडारोडा हटविण्यास ठेकेदाराची टाळाटाळ; देहू नगरपंचायतीची नोटीस कागदावरच?

देहूगाव । प्रतिनिधी

भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाचे काम करताना इंद्रायणी नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा अद्याप हटविण्यात आलेला नाही. संबधित ठेकेदाराने १५ दिवसांत राडारोडा काढणार असे सांगितले होते. ऑक्टोबर अखेर, इंद्रायणी नदीतील पाणी आटल्याने, राडारोडा तसाच जागेवर असल्याचे उघड झाले होते. तत्पूर्वी देहू नगरपंचायतीने संबंधित जावळे कन्स्ट्रक्शनला राडारोडा हटवून नदीपात्र पूर्ववत करण्याची नोटीस बजावली होती. परंतु अद्याप संबंधित ठेकेदाराने राडारोडा हटविला नाही. यामुळे ठेकेदारावर प्रशासन एवढे मेहेरबान का, असा प्रश्न नागरिक करत आहेत.

परंतु दुसऱ्या दिवशी पाट बंधारे विभागाने संबंधित जावळे कट्रक्शनवर कृपा केली आणि धरणातून पाणी सोडले. परिणामी इंद्रायणी नदीत पाणी आल्याने, उघडा पडलेला राडारोडा पाण्याखाली झाकला गेला. आता त्यामुळे नगर पंचायतीने दिलेली नोटीस आता फक्त कागदावरच राहिली आहे. नगर पंचायतीने त्या ठेकेदारावर कारवाई करणे आवश्यक असताना, नगर पंचायतीचे अधिकारी जावळे कन्ट्रक्शनवर कारवाई न करता मेहेरबानी का करीत आहेत, असा प्रश्न देहूचे ग्रामस्थ उपस्थित करू लागले आहेत. आता देहू नगर पंचायत, काय दंडात्मक कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

देहू नगरपंचायत हद्दीतील साई चौक ते वडाचा माळदरम्यान असलेल्या पुलाजवळ भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पांतर्ग पाइपलाइन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नदीपात्रात टाकलेला राडारोडा आणि बांधकामातील अवशेष पूर्णपणे हटविणे आवश्यक होते. मात्र, ते हटविण्यात आलेले नाहीत. यामुळे पावसाचा व नदीला पाणी सोडल्यानंतर आजूबाजूच्या रहिवाशांना व शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे.

नदीच्या प्रवाहात बदल; शेतकऱ्यांचे नुकसान

नदीपात्रात टाकण्यात आलेल्या राडारोड्यामुळे इंद्रायणी नदीच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. परिणामी, येलवाडी परिसरातील शेतजमिनीत पाणी शिरून शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. याला जबाबदार कोण? देहूनगर पंचायत की, जावळे कन्ट्रक्शन राहणार, असा प्रश्न आता शेतकरी उपस्थित करू लागले आहेत. नदीपात्रातील राडारोडा आणि बांधकाम साहित्य अद्याप हटविण्यात आले नसल्याने नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण होण्याची शक्यता नगरपंचायतीने नोटिशीत नमूद केली होती. नदीपात्रातील सर्व अवशेष हटवून ते पूर्ववत करणे ही संबंधित ठेकेदाराची जबाबदारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते.

नोटीसनंतरही राडारोडा तसाच

नगर पंचायतीने दोन दिवसांची मुदत देऊनही नदीपात्रातील राडारोडा अद्याप कायम असल्याचे प्रत्यक्ष परिस्थितीवरून दिसत आहे. त्यामुळे नगरपंचायतीच्या नोटीसनंतरही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. जावळे कन्ट्रक्शनकडून, देहू नगर पंचायतीच्या नोटीसला वाटाण्याच्या अक्षदा लावला असल्याचे स्पष्ट होत आहे.

नाशिक फाटा चौकात खड्ड्यांची 'मलमपट्टी'! सिमेंटचे गट्टू टाकल्याने वाहतूक मंदावली, अपघाताचा धोका

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवडमधील अत्यंत वर्दळीच्या नाशिक फाटा मुख्य चौकातील पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावरील डांबरी भाग उखडल्याने मोठे खड्डे निर्माण झाले असून, हे खड्डे बुजवण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात सिमेंटचे गट्टू टाकण्यात आले आहेत. मात्र, या तात्पुरत्या उपाययोजनेमुळे वाहनचालकांची गैरसोय होत असून, वाहतुकीचा वेगही मंदावला आहे.

नाशिक फाटा चौक हा भोसरी-पुणे मार्गावरील महत्त्वाचा चौक असून, या ठिकाणी दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. विशेषतः पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना या उखडलेल्या रस्त्यामुळे सावकाश मार्गक्रमण करावे लागत आहे. परिणामी, चौकात वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

या चौकात वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल यंत्रणा कार्यरत असतानाच रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. दुचाकीस्वारांना या ठिकाणाहून जाताना विशेष काळजी घ्यावी लागत असून, खड्ड्यांमधील दगडी गट्टू आणि उखडलेला रस्ता अपघाताचा धोका निर्माण करू शकतात. कामाच्या वेळेत या मार्गावरून जाणाऱ्या चाकरमान्यांना आणि रुग्णवाहिकांनाही या वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसत आहे.



नागरिकांची होणारी रोजची घुसमट आणि अपघाताची टांगती तलवार लक्षात घेता, संबंधित महापालिका प्रशासनाने या रस्त्याची तातडीने पाहणी करून दर्जेदार डांबरीकरण व कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

तात्पुरत्या दुरुस्तीऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करा!

महत्त्वाच्या चौकातील रस्त्याची अशी अवस्था असताना केवळ दगडी गट्टू टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न कितपत प्रभावी ठरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महापालिकेचा विभाग याकडे डोळेझाक करत असून, केवळ मलमपट्टी करून जबाबदारी झटकली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पावसाळा असो वा नसो, या रस्त्याची अवस्था बिकटच राहत असल्याने प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पाणीपुरवठा विभागाकडून येथे खोदाई करण्यात आली आहे. पाणीपुरवठ्याची पाइपलाइन दोन वेळा लिकेज झाली होती. पहिल्यांदा दुरुस्ती करण्यात आली; मात्र पुन्हा लिकेज झाल्याने काम करावे लागले. सध्या दिवाळीमुळे डांबरीकरणाचे प्लांट बंद आहेत. दिवाळी संपल्यानंतर या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येईल. खोदाईची दुरुस्ती पाणीपुरवठा विभागाऐवजी स्थापत्य विभागामार्फत केली जाणार आहे.

संतोष कुदळे, उपअभियंता, शहर दळणवळण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

नाशिक फाटा हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा चौक आहे. या मार्गावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. अशा महत्त्वाच्या रस्त्यावर खड्डे पडणे आणि ते बुजवण्यासाठी केवळ दगडी गट्टू टाकणे ही तात्पुरती मलमपट्टी आहे. यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. आधीच सिग्नलवर वाहनांची गर्दी असते, त्यात रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. महापालिका प्रशासनाने केवळ तात्पुरती डागडुजी न करता या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून वाहनचालकांना दिलासा द्यावा.

पिंपरी-चिंचवड महापालिकेवर १,७४६ कोटींच्या कर्जाचा डोंगर; आर्थिक गणित बिघडण्याची भीती

पिंपरी । प्रतिनिधी

उद्योगनगरीत अत्यावश्यक विकासकामे पूर्ण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून कर्ज काढण्यात येत आहे. पाणीपुरवठा, ड्रेनेजलाईन, पाण्याचा पुनर्वापर, रुग्णालय आदींसाठी एकूण १ हजार ७४६ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज घेण्यात येणार आहे. महापालिका इतिहासात इतक्या मोठ्या रकमेचे कर्ज प्रथमच घेण्यात येत असल्याने त्या ओझ्यामुळे महापालिकेच आर्थिक गणित बिघडण्याचा धोका वाढला आहे.

शहरासाठी आवश्यक असलेली मात्र, खर्चिक प्रकल्प निधीअभावी अडकून पडले आहेत. वाढत्या लोकसंख्येसाठी अत्यावश्यक असलेला पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. शहरातील पाण्याची ३५ टक्के पाणी गळती रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील जुनी ड्रेनेजलाईन काढून नव्याने व अधिक क्षमतेची ड्रेनेजलाईन टाकण्याचा मास्टर प्लान तयार करण्यात आला आहे. तसेच, पाण्याची गरज भागवण्यासाठी सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण प्रकल्प अनेक वर्षांपासून पडून आहे. कचर्याचे डोंगर कमी करण्यासाठी मोशी कचरा डेपोत नवीन घनकचरा व्यवस्थापन (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. मोशी रुग्णालय प्रकल्पाच कामे सुरू आहे. हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महापालिकेस निधीची कमतरता भासत आहे. त्या कारणांमुळे हे प्रकल्प अडकून पडल्याचा दावा अधिकार्यांनी केला आहे. त्या-त्या विभागाशी चर्चा करून महापालिकेच्या मुख्य लेखा व वित्त विभागाने कर्ज घेण्याचा प्रस्ताव तयार केला आहे.

या सर्व प्रकल्पांसाठी तब्बल ५ हजार ७९७ कोटी रुपयांची गरज आहे. एक हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या पवना बंदिस्त जलवाहिनीसाठी ७०० कोटी रुपये, एक हजार ९३ कोटी खर्चाच्या ड्रेनेजलाईन कामासाठी ५४६ कोटी रुपये तसेच, मोशी रुग्णालयासाठी ५०० कोटींचे असे एकूण १ हजार ७४६ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज काढण्यात येणार आहे. या कर्जासह व्याजाचा मोठा आर्थिक भार पडणार आहे. महापालिकेची स्थापत्य, पाणीपुरवठा, ड्रेनेजलाईन, पर्यावरण व विद्युत विभागांच्या वेगवेगळ्या कामांसाठी सन २०२८ पर्यंत तब्बल ४ हजार कोटी रुपयांचे देणे आहे. महापालिका अर्थसंकल्पाच्या ३५ टक्क्यांहून अधिक खर्च अधिकारी व कर्मचार्यांच्या वेतनावर होत आहे. कर्जामुळे महापालिकेचे कामकाज सुकर चालवायचे असल्यास उत्पन्नाचे नवनवीन स्रोत निर्माण करून, वारेमाप खर्चाला लगाम घालत, कठोरपणे काटकसरीचे धोरण स्वीकारणे गरजेचे आहे, अन्यथा महापालिकेचे आर्थिक गणित बिघण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेस देणी

स्थापत्य विभागाचे ४ हजार ४१४ कोटी ७४ लाख रुपयांची कामे सुरू आहेत. पाणीपुरवठा विभागाची १ हजार १५१ कोटी १९ लाख रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत. ड्रेनेजलाईन विभागाची २६१ कोटी रुपये खर्चाची कामे सुरू आहेत. पर्यावरण विभागाची ८७१ कोटी खर्चाची कामे चालू आहेत. विद्युत विभागाची २४३ कोटी रुपये खर्चाची कामे प्रगतीपथावर आहे. ही कामे पुढील दोन वर्षे चालणार आहे. त्या एकूण ८७४ कामांसाठी महापालिकेवर सुमारे ४ हजार कोटी रुपयांचे (दायित्व) देणे आहे. तसेच, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात जुन्या ठेकेदार लवादात गेला असून, त्याने महापालिकेच्या विरुद्ध ४९६ कोटी ४८ लाख रुपये नुकसान भरपाईचा दावा केला आहे.

page 6_Layout 1 11/10/2026 12:47 AM Page 1

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन खंबीरपणे पाठिशी–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

भिलपुरीत शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी



जालना, दि.९(जिमाका) : राज्यात दुष्काळाचे संकट निर्माण झाले असले, तरी शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असून, त्यांना आवश्यक ती सर्व मदत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिली जाईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना तालुक्यातील भिलपुरी येथे दिली.

जालना तालुक्यातील भिलपुरी येथील दुष्काळग्रस्त शेतकरी अंबादास तांगडे यांच्या घरी भेट देऊन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी तांगडे कुटुंबीयांशी संवाद साधत शेतीची परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची माहिती घेतली. याप्रसंगी त्यांनी कुटुंबासोबत पारंपरिक बेसन, बाजरीची भाकरी, गावरान ठेचा आणि चटणी अशा ग्रामीण जेवणाचा आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, मी देखील शेतकरी कुटूंबातील आहे. त्यामुळे तांगडे यांच्या घरी आल्यासारखे वाटत नसून स्वतःच्याच घरी आल्याची भावना आहे. शेतकऱ्यांवर मोठे संकट आले असून, या परिस्थितीत समाजातील प्रत्येकाने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे. शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला असून, अनेक शेतकऱ्यांच्या खात्यांत ही रक्कम जमा झाली आहे. तसेच दुष्काळ जाहीर केल्यानंतर बारा कलमी सवलतींची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नुकसान भरपाईसह पीक कर्जाचे पुनर्गठन, सक्तीच्या वसुलीला स्थगिती, शैक्षणिक शुल्कात सवलत आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.

अंबादास तांगडे यांच्याकडे केवळ एक एकर शेती असून, पत्नी मंदाबाई, दोन मुली, एक मुलगा आणि आई अशा कुटुंबाचा उदरनिर्वाह या शेतीवर अवलंबून आहे. कुटूंबाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर शिंदे यांनी तांगडे यांच्या मुलीशी संवाद साधला. तिला भविष्यात पोलीस अधिकारी व्हायचे असल्याचे समजल्यानंतर तिच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची संपूर्ण जबाबदारी स्वीकारत असल्याचे त्यांनी जाहीर केले.

याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील ज्या शेतकरी कुटूंबांतील मुलींचे विवाह ठरले आहेत, अशा कुटूंबांची माहिती संकलित करून सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा निर्णयही त्यांनी यावेळी जाहीर केला. शेतकरी कुटूंबांना आधार देण्यासाठी महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकली आणि गरजू कुटूंबांना दिवाळीचा शिधा देण्याचे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी पावसाळ्यापर्यंत दुष्काळग्रस्त भागात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी, चारा आणि अन्नधान्य उपलब्ध राहावे, यासाठी शासन नियोजन करीत आहे. केंद्र सरकारही महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकरी हा शासनाच्या तिजोरीवरील पहिला हक्कदार असून, त्याला मदत करताना सरकार कोणतीही कमतरता ठेवणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी धीर सोडू नये आणि कोणताही टोकाचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

























महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ — पान नं. ७

उस्माननगरसह जिल्ह्यात दिपावली- लक्ष्मीपूजन उत्साहात साजरी

नांदेड । माणिक भिसे

प्रत्येकांच्या जीवनात सुख समृद्धी मांगल्य व उत्साह राहावा अशी एकमेकांना सदिच्छा व्यक्त करून व्यापारी, वर्गासह बळीराजा आणि सामान्य नागरिकांनी आपापल्या घरामध्ये दुकानांमध्ये, वाहनांची मनोभावे लक्ष्मीपूजन करून हा सण पारंपरिक पद्धतीने साजरा केला.

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर नवीन गाड्या सोन – नाणं, घर घेतले. दुकानदारांचे (व्यापारी) वर्गांचे नवीन आर्थिक वर्ष सुरू होते. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आलेली दिवाळी नागरिकांनी धुमधडाक्यात साजरी केली. दिनांक ६, ७ नोव्हेंबर खऱ्या अर्थाने दिवाळीला सुरुवात झाली. रविवारी ८ नोव्हेंबर रोजी मात्र सूर्य मावळल्यानंतर फटाक्यांचे आवाज परिसरात होऊ लागले. आकाशात व परिसर फटाक्यांनी व रोषणाईने मने मोहून घेत होते. महिला मंडळीचीचा सडा रांगोळीचा लगबग दिसून आली. व्यापारी वर्ग दिवाळीच्या आठ दिवस अगोदरच दुकानांची रंगरंगोटी, साफसफाईत व्यस्त होते. महागाईचा फटका स्वभाविकच दिवाळीतही जाणवला. प्रत्येक वस्तूचे भाव वाढले असल्याने नागरिकांच्या जीवाची घालमेल होत होती. बाजारात दुकान मालक. केळीचे खांब, ऊस, फुल, प्रसाद घेण्यासाठी गर्दी केली होती. लक्ष्मीपूजनाच्या वेळी नवीन खाते वही व्यापारी सुरू करतात. लक्ष्मीचे पान विक्रीसाठी उपलब्ध होते. नांदेड जिल्ह्यांसह उस्माननगर परिसरात लहाना पासून ते मोठ्या पर्येत सर्वजण यंदाच्या दिवाळीसाठी प्रतिक्षेत होते. लक्ष्मीपूजनला सर्वत्र रोषणाईने झगमगाट पसरला होता. सायंकाळी प्रत्येक दुकानात पुजा करुन मित्र परिवार यांना पान सुपारी साठी आमंत्रण दिले व एकमेकांना दिपावली निमित्त शुभेच्छा दिल्या. यंदा पावसाने डोळे वटारल्याने दुष्काळ परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी दिवाळी साजरी केली. उस्माननगर परिसरात यंदाची दिवाळी अकाश दिव्यांनी उजळून प्रकाश व फटाक्याची अतिषबाजीने उत्साहात साजरी झाली.

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून चारा पिकांची लागवड करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

सात प्रकारच्या सुधारित चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड, जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी हिरवा व कोरडा चारा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा पिकांच्या लागवडीची कामे हाती घ्यावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. नैऋत्य मोसमी पावसातील तूट, एल निनोचा प्रभाव आणि रब्बी हंगामातील पेरणी क्षेत्रात संभाव्य घट यामुळे आगामी काळात चारा उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन गायरान जमिनी तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर सुधारित चारा पिकांची लागवड करण्याची कामे मंजूर करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेंतर्गत मका, ज्वारी, बाजरी, नेपियर गवत, मेथी घास, ज्वारी मल्टीकट आणि बाजरी मल्टीकट अशा सात प्रकारच्या चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या पिकांसाठी हेक्टरी आर्थिक तरतूद व रोजगार निर्मितीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार मका पिकासाठी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस, नेपियर गवतासाठी ७६ हजार ३१ रुपये व १५५ मनुष्यदिवस, मेथी घासासाठी १ लाख १३ हजार २९० रुपये व २७० मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी ५१ हजार ३६ रुपये व १०० मनुष्यदिवस, तर बाजरी मल्टीकटसाठी ७६ हजार ४४ रुपये व १८० मनुष्यदिवस रोजगार निर्मितीची तरतूद आहे.

या लागवडीसाठी आफ्रिकन टॉल, एनएमएच-४०५३, न्यूट्री गोल्ड, सीएसव्ही-३३ एमएफ, न्यूट्रीफास्ट, यशवंत, जयवंत, सुपर नेपियर, आरएल-८८, सीओ-१, जायंट बाजरी आदी सुधारित वाणांचा वापर करता येणार आहे. आवश्यक बियाणे महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृभको, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्र यांसारख्या अधिकृत संस्थांमार्फत उपलब्ध करून घेता येईल. या योजनेत मजुरांच्या श्रमांना प्राधान्य देण्यात आले असून, मजुरांमार्फत करणे शक्य असलेल्या कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर करण्यास मनाई आहे. त्यामुळे चारा उत्पादनासोबतच ग्रामीण भागात स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे.

या कामांची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वैयक्तिक शेतकऱ्यांनी तसेच ग्रामपंचायतींनी आपल्या कार्यक्षेत्रातील गायरान जमिनीवर आणि पात्र लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यासाठी पुढाकार घ्यावा. संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासोबतच पशुधनाचे संवर्धन आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती साध्य करण्यासाठी या योजनेचा प्रभावी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

श्रीनगरमध्ये पोलिसांचा सापळा! चोरीचे सोने विकायला आलेला चोरटा जेरबंद

दोन घरफोड्यांचा छडा, ३.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त; भाग्यनगर गुन्हे शोध पथकाची कारवाई

नांदेड । प्रतिनिधी

डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अत्यंत शिताफीने तपास करत घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. चोरीचे सोने विक्रीसाठी आलेल्या एका आरोपीला रंगेहाथ पकडून त्याच्याकडून २४.०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ३,४८,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दिनांक ०८/११/२०२६ रोजी दुपारच्या सुमारास भाग्यनगर पोलीस ठाणे येथील पोउपनि / नरेश वाडेवाले यांना आपल्या गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, एक संशयित इसम चोरीचे सोन्याचे दागिने विक्री करण्याच्या उद्देशाने श्रीनगर परिसरात येणार आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत गुन्हे शोध पथकाने तात्काळ श्रीनगर परिसरात सापळा लावला. दुपारच्या सुमारास बातमीदाराने दिलेल्या वर्णनानुसार एक संशयित इसम त्या ठिकाणी फिरताना दिसून आला. पोलिसांनी पथकाने त्यास ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या इसमाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव आकाश ऊर्फ पप्पू अशोक कांबळे (वय



२५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. पालीनगर, नांदेड) असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या पॅन्टच्या खिशात सोन्याचे दागिने आढळून आले. त्याच्याकडे या दागिन्यांबाबत अधिक विचारपूस केली असता सर्व दागिने चोरीचे असल्याची कबुली त्याने दिली. सखोल तपासात त्याने दोन ठिकाणी घरफोडी केल्याचे कबूल केले. १) पहिली घरफोडी (ज्योतिबा नगर): दिनांक ०२/११/२०२६ रोजी पहाटे ०३.०० वाजेच्या सुमारास छोटू कॉर्नर जवळील ज्योतिबा नगर येथील एका बंद घराचे कुलूप तोडून चोरले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे पोलीस ठाणे भाग्यनगर गु.र.नं. ६५१/२०२६ कलम ३३१ (३), ३३१ (४) ३०५ (ब) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल आहे.

२) दुसरी घरफोडी (तथागत नगर): दिनांक २५/१०/२०२६ रोजी पहाटे ०२.३० वाजेच्या सुमारास तथागत नगर परिसरात घरफोडी करून चोरल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी भाग्यनगर गु.र.नं. ६१९/२०२६ कलम ३३१ (४) ३०५ (ब) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल आहे. या कारवाईत आरोपीकडून एकूण २४.०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (एकूण किंमत ३,४८,०००/- रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक / नरेश वाडेवाले हे करत आहेत. सदरची कारवाई डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशाने संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक / संतोष तांबे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक / नरेश वाडेवाले व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार विशाल माळवे, राजीव घुले, रमेश सूर्यवंशी, राहुल लाठकर, अदनान पठाण (सर्व नेमणूक पो.स्टे. भाग्यनगर, नांदेड) तसेच नांदेड सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर आणि दीपक ओढणे यांनी पार पाडली आहे.

पत्रकार अजीम अन्सारी यांना पितृशोक वयाच्या ८० व्या वर्षी अन्सारी अब्दुल गणी यांचे निधन

देगलूर । अजीम अन्सारी

देगलूर येथील तरुण व होतकरू पत्रकार अजीम अन्सारी यांचे वडील



अन्सारी अब्दुल गणी अब्दुल हमीद (वय ८० वर्षे) यांचे ६ नोव्हेंबर २०२६ रोजी वृद्धापकाळाने अल्पश आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, तीन मुली, सून, जावई, नातू, नातवंडे आणि मोठा परिवार आहे.

स्वर्गीय अब्दुल गणी यांच्यावर उदगीर येथील मकबरा नावांबान परिसरातील कब्रिस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात दफनविधी व अंत्यसंस्कार पार पाडण्यात आले. त्यांच्या जाण्याने अन्सारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, पत्रकार वर्तुळातून आणि विविध सामाजिक-राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. अन्सारी कुटुंबाच्या या दुःखद प्रसंगी देगलूरसह परिसरातील पत्रकार बांधव आणि नागरिकांनी सहवेदना व्यक्त करून दिवंगत आत्म्यास शांती लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली आहे.

दोन वर्षांपासून विहिरींचे अनुदान रखडले; संतप्त शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा!

उमरखेड । प्रतिनिधी

मनरेगाअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करूनही दोन वर्षांपासून अनुदान मिळाले नसल्याने उमरखेड तालुक्यातील चिल्ली (ज.) येथील पाच शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. येत्या सात दिवसांत अनुदान जमा न झाल्यास पंचायत समितीसमोर उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. चिल्ली (ज.) येथील अंकुश लक्ष्मण राठोड, भारत बाभनाजी राठोड, महेश कैलास राठोड, मिथुन परसराम जाधव आणि पंचफुलाबाई जालमसिंग जाधव यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) वैयक्तिक सिंचन विहिरींसाठी अर्ज केले होते.

या अर्जांना मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी विहिरींचे खोदकाम आणि बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण केले. मात्र, कामे पूर्ण होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला तरी अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यांत जमा झालेली नाही.

विहिरींचे काम पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी मजूर लावले होते. त्यांची मजुरी देण्यासाठी शेतकऱ्यांनी आर्थिक जुळवाजुळव केली. मात्र, अनुदान रखडल्याने मजुरांची देणी थकली आहेत. मजूर वारंवार पैशांची मागणी करीत असल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक पेच निर्माण झाला आहे. योजनेच्या अनुदानावर विसंबून कामे पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांना आता देणी देण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

गरजूंसोबत दिवाळीचा आनंद; विक्रम पाटील बामणीकर यांचा सामाजिक उपक्रम!

छावा मराठा युवा महासंघाच्या वतीने अंध व्यक्तींना आर्थिक मदत, महिलांना साडी-चोळी, फराळ व जिलबीचे वाटप

नांदेड । प्रतिनिधी

दिवाळीचा सण सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जात असताना समाजातील अनेक गरीब व गरजू व्यक्तींना आर्थिक परिस्थितीमुळे सणाचा आनंद घेता येत नाही. अशा वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने छावा मराठा युवा महासंघाचे उपजिल्हाप्रमुख विक्रम पाटील बामणीकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी केली.

नांदेड येथील शिवाजीनगर पुलावर वास्तव्यास असलेल्या अंध व्यक्तींना



आर्थिक मदत करण्यात आली. तसेच गरजू महिलांना साडी-चोळी, वस्ती टोपी, जिलबी व दिवाळीचा फराळ भेट देऊन त्यांच्या आनंदात सहभागी झाले. दिवाळी म्हणजे केवळ स्वतःच्या कुटुंबासोबत आनंद साजरा करणे नव्हे, तर समाजातील गरजू आणि वंचित घटकांच्याही आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करणे होय, हा संदेश विक्रम पाटील बामणीकर यांनी आपल्या कृतीतून दिला. त्यांच्या या उपक्रमातून माणुसकी, सामाजिक बांधिलकी आणि गरजूंच्या मदतीचा आदर्श समाजासमोर निर्माण झाला असून, त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

शिंदे सेनेच्या आनंदाचा शिधा वाटपास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

देगलूर । अजीम अन्सारी

देगलूर येथून हाकेच्या आंतरावर असलेल्या महालक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालयात शिंदे सेने कडून दिवाळी निमित्त आनंदाचा शिधा वाटपाचा कार्यक्रम ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ महाव्यवस्थापक तथा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. नांदेड जिल्ह्यातील देगलुर तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती उद्भवल्यामुळे दिवाळीच्या सण उत्सवाच्या कालावधीत गरजू परिवारांना दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दिवाळीचा सण उत्साहात साजरे करता यावे म्हणून गरजूंना शिंदे सेने कडून



आनंदाचा शिधा मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना खतगावकर म्हणाले, राज्यातील शालेय मुलींना मोफत शिक्षण उपलब्ध करून त्यांना २५००० सायकल मोफत देण्यात आले तसेच राज्यातील महिलासाठी लाडकी बहीण योजना राबविण्या मागे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे योगदान प्रमुख असल्याचे सांगितले व मुक्रामाबाद येथील आंतरराज्य जल प्रकल्पाच्या उर्वरित कामास पुरेसे निधी उपलब्ध करून दिल्याने या आलयामुळे आगामी कालावधीत प्रकल्पात वाढीव जलसाठा ठेवता येईल व तालुक्यातील अनेक सर्कल मधील गावे सिंचनाखाली येतील असे खतगावकर यांनी आपल्या भाषणातून म्हणाले यावेळी व्यासपीठावर शिंदे सेनेचे जिल्हाध्यक्ष, विविध तालुकाध्यक्ष, सर्कल प्रमुख, शाखा प्रमुख यांच्या सह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

दिवाळीच्या लक्ष्मीपूजनानंतर नायगाव शहरात सह्याद्री गारमेंटला भीषण आग!

नायगाव । प्रतिनिधी

दिवाळीच्या लक्ष्मीपूजनानंतर आनंदाचे वातावरण असताना नायगाव शहरातील नरसी रोडवरील कल्याण कॉप्लेक्स मधील सह्याद्री गारमेंट या कापड दुकानाला भीषण आग लागल्याची घटना सोमवारी (दि.९) पहाटे उघडकीस आली. या आगीत दुकानातील कपडे व इतर साहित्य जळून खाक झाले असून, अंदाजे ५० लाखच्या वर रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आगीचे कारण अद्याप उघड झाले नाही. या घटनेमुळे दुकान मालक संतोषी शेषराव शिंदे कोकलेगावकर कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

नायगाव येथील नरसी रोड वरील कल्याण कॉम्प्लेक्समध्ये, कॅनरा बँके जवळ असलेल्या सह्याद्री गारमेंट या दुकानाला लक्ष्मीपूजनानंतर रात्रीच्या सुमारास आग लागली. सोमवारी पहाटे पाच ते सहा वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. पहाटे सहा वाजता शेजारचे दुकान दार कोकुलवार हे नेहमी प्रमाणे सकाळी सहा वाजता दुकानातून सामान काढायला गेल्या नंतर धूर व आग दिसू लागली घटनेचे वृत्त वाऱ्यासारखे संपूर्ण गावात पसरले. नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्यासाठी मदतीचा हात पुढे केला.

घटनेची माहिती मिळाल्या नंतर एक तासांनी नायगाव नगरपंचायतीच्या अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामक दलाचे जवान आणि उपस्थित नागरिकांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीची तीव्रता अधिक असल्याने दुकानातील कपडे आणि अन्य साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने दुकानाच्या शेजारी असलेले सेतू केंद्र, दुग्धजन्य पदार्थांचे दुकान तसेच कॅनरा बँक आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून ग्रामस्थ यांनी केलेल्या प्रयत्नाने बचावली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

पती पत्नीने कष्टाने उभे केलेले स्वप्न आगीत भस्मसात!

या घटनेतील सर्वाधिक वेदनादायी बाब म्हणजे शेषराव शिंदे व त्याचा बंधू नायगाव शहरातील नामांकित कापड दुकानात मुनिम होते. दोघांच्या अनुभवातून हे दुकान थाटले होते. शेषराव व संतोषी शिंदे यांचा हे दुकान प्रसिद्धीस यावे हा खटाटोप करीत संघर्ष चालू होता. अनेक दिवस कापड दुकानात मुनिम म्हणून नोकरी करून त्यांनी अनुभव मिळविला. त्यानंतर जवळचे जमा भांडवल आणि बँकेचे कर्ज यांच्या बळावर पत्नीच्या सहकार्याने चार वर्षांपूर्वी सह्याद्री गारमेंट या दुकानाची सुरुवात केली होती. मोठ्या कष्टाने आणि जिद्दीने उभा केलेला व्यवसाय चांगल्या प्रकारे सुरू असताना आगीच्या या दुर्घटनेने त्यांच्या स्वप्नांची अक्षरशः राखरांगोळी केली आहे.

दिवाळीच्या सणात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरातील व्यापारी व नागरिकांतून हळहळ व्यक्त होत आहे. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

रब्बी हंगामातील पिकांना विमा संरक्षण; नांदेड जिल्ह्यात पीक विमा नोंदणी सुरू

ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर, तर गहू, हरभरा व मक्यासाठी १५ डिसेंबर अंतिम मुदत; शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी सहभागी व्हावे

नांदेड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२६-२७ अंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे, यासाठी पीक विमा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १८७ शेतकऱ्यांनी विमा नोंदणी केली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. या योजनेत ज्वारी पिकासाठी ३० नोव्हेंबर २०२६, तर गहू, हरभरा आणि मका पिकांसाठी १५ डिसेंबर २०२६ ही विमा नोंदणीची अंतिम मुदत आहे. शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी रब्बी हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ १.५ टक्के तर खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. ज्वारीसाठी हेक्टरी ३६ हजार रुपये विमा संरक्षित रक्कम असून, शेतकरी हिस्सा ५४० रुपये आहे. गव्हासाठी ४५ हजार रुपये संरक्षित रकमेवर ६७५ रुपये, हरभऱ्यासाठी ३६ हजार रुपये संरक्षित रकमेवर ४६८ रुपये, तर मक्यासाठी ५० हजार रुपये संरक्षित रकमेवर ५०० रुपये विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अधिसूचित क्षेत्रांमध्ये संबंधित पिकांसाठी ही योजना लागू राहणार आहे. योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. खातेदार शेतकऱ्यांसह कुळाने अथवा भाडेतत्त्वावर शेती करणारे शेतकरीही पात्र असून, भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक शेतकरी ओळख क्रमांक, असणे अनिवार्य आहे. यासोबतच आधार कार्ड, बँक पासबूक, पीक पेरा स्वयंघोषणापत्र, सातबारा, आठ अ आवश्यक आहे. तसेच पीक नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणीअंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे. सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकरी सहभागासाठी प्रती अर्ज किमान ०.१० हेक्टर मर्यादा राहील.

या योजनेची अंमलबजावणी इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. नववा मजला, ऑफिस ए, नेक्सस वेस्टेंड, सेक्टर १, बिल्डींग ए, सर्वे नंबर १६९/१, परिहार चौकाजवळ, डीपी रोड, औंध, पुणे-४११००७ (ई-मेल : supportagrieffcotokio.co.in) मार्फत करण्यात येणार आहे. इच्छुक बिगर कर्जदार शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र तसेच विमा कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी व मध्यस्थांमार्फत विमा अर्ज आणि विमा हप्ता सादर करता येईल. पीक विमा योजनेत सहभागी होताना चुकीची कागदपत्रे, बोगस सातबारा उतारे किंवा बनावट भाडेकरार सादर केल्यास संबंधितांवर कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यात येणार असून, अशा प्रकरणांत कृषी विभागाच्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ पाच वर्षांसाठी बंद करण्यात येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य कागदपत्रांसह विहित मुदतीत पीक विमा नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

















जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).